देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर.

**(विधी व न्याय विभाग अंतर्गत)**

सि. स. नं. २४०२/२ ए वॉर्ड, अपना बँक बिल्डींग तळमजला, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५० फॅक्स: (०२३१) २६२६७५०
E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com

क्र. देव वशि जा. ९३०७/२०२४ दिनांक - 26 JUL 2024

## स्क्रॅप विक्री करणे कामी दर देणे बाबत (व्दीतीय मागणी)

श्री केदारलिंग (श्री जोतिबा) देवस्थान कडील मंदिर आवारातील रेलिंगच्या पाईप, त्यावर असलेले पाईपचे शेडचे भाग, दर्शन रांगेमध्ये असलेल्या जुन्या जिन्याचे गंजलेले लोखंडी साहित्य, जुन्या फुटलेल्या पीव्हीसी पाईप, रस्त्यावर लावलेले खराब बुम बॅराकेटींग, जुन्या डिजिटल बोर्डच्या खराब पाईप्स, जुने गंजलेले पत्रे अशा व इतर किरकोळ खराब साहित्य निर्गत करणेचे आहे. सदर सर्व साहित्य ठेवले ठिकाणावरुन आवश्यकते नुसार कटींग करुन वर्गीकरण करुन त्याचे वजन करुन गाडीमध्ये भरणे व घेवून जाणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामी साहित्य विक्री करणे करीता किलो तत्वावर सीलबंद दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| क्र. | साहित्याचा तपशील | दर प्रति किलो |
|---|---|---|
| १ | जी आय पाईप्स् | रु. /- |
| २ | एम. एस. पाईप्स् (लोखंडी) | रु. /- |
| ३ | एम. एस. स्ट्रक्चरल मेंबर (Angle, I section, C section इत्यादी) | रु. /- |
| ४ | पीव्हीसी पाईप्स् | रु. /- |
| ५ | पन्हाळी पत्रे | रु. /- |

सदर कामी स्क्रॅप घेणारे मक्तेदार यांना विनंती करणेत येत आहे की, श्री केदारलिंग देवस्थान वाडीरत्नागिरी येथे ठिकठिकाणी ठेवणेत आलेल्या खराब (भंगार) वस्तूंची पाहणी करा व वरील सर्व वस्तूंकरीता तुमचे सर्वोच्च दर सीलबंद कव्हरमध्ये दि. 05/08/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत मुख्य कार्यालयाकडे पोहोच करणेत यावेत. सदर दरपत्रक शक्य झालेस दि. 06/08/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत उघडले जातील.

सदर कामी विक्री करावयाचे साहित्य पाहणेकरीता ऑफिसर इनचार्ज, श्री केदारलिंग देवस्थान कार्यालय, मौ. वाडीरत्नागिरी ता. पन्हाळा जि. कोल्हापूर येथे प्रत्यक्ष भेट देवून संपर्क करावा.

१) संपूर्ण साहित्य पाहून दर देणेचे आहेत. याबाबत नंतर तक्रार ऐकली जाणार नाही.
२) साहित्य त्या ठिकाणी ठेवले आहे त्याठिकाणावरुन स्वखर्चाने वाहतूक करुन घेऊन जाणेचे आहे. त्यामध्ये लोर्डींग अनलोडींग खर्च मक्तेदार यांनी स्वत: करावायाचा आहे. त्याकरीता साहित्य ठेवलेली जागा पाहणेची आहे. नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.
३) सदर साहित्य काढताना त्याशेजारी असलेल्या कोणत्याही वस्तूस नुकसान झालेस त्याचे दुरुस्तीचा खर्च मक्तेदार यांचेकडुन वसुल केला जाईल.
४) सदर भंगाराची विक्री काटेकोरपणे जसे आहे जेथे आहे तत्वावर आहे. कटिंग नाही, वेगळे करणे नाही, भंगाराची निवड नाही अशा कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
५) सदर साहित्य हे जागेवर वजन करुन त्यानंतरच गाडीमध्ये भरणेचे आहे. सदर वजन समितीने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यासमोर करणेचे आहे.
६) सदर कामी दरपत्रकासोबत रक्कम रु. ५०००/- चा देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या नावे डिडी सोबत जोडणे आवश्यक आहे.

७) या कार्यालयाकडे जमा असलेली बयाणा रक्कम ही मंजूर दरपत्रक धारकाने यशस्वीरित्या साहित्य उचलले नंतर बिनव्याजी परत करणेत येईल. नामंजूर दरपत्रक धारकाची बयाणा रक्कमेचा डीडी हा मंजूर दरपत्रकधारकास आदेश दिलेनंतर बिनव्याजी परत करणेत येईल.

८) दर मंजूर करणेचे अगर नामंजूर करणेचे अंतिम अधिकार मा. प्रशासक, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांना असून याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

९) वरील शर्तीचे यादीत ऐन वेळी फेरबदल करणेचा अधिकार मा. प्रशासक, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांना राहतील.

Shinde 20/7/24

सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

प्रत -

१) देवस्थान समिती मुख्य कार्यालय नोटीस बोर्डवर लावणेसाठी
२) श्री करवीर निवासिनी मंदिर, कोल्हापूर नोटीस बोर्डवर लावणेसाठी
३) श्री केदारलिंग देवस्थान मौ. वाडीरत्नागिरी ता. पन्हाळा जि. कोल्हापूर नोटीस बोर्डवर लावणेसाठी
४) श्री सिध्दीविनायक मंदिर, कोल्हापूर नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
५) श्री दत्तभिक्षालिंग मंदिर, कोल्हापूर नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
६) श्री बिनखांबी गणेश मंदिर, कोल्हापूर नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी